Indian Academy of Pediatrics (IAP)

महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)

## प्रकरण १०३ :

# लहान मुलांमधील करोना व्हायरस आजार २०१९ (२५/४/२०२१ तारखेस उपलब्ध माहितीनुसार)

कोव्हीड संसर्गाचा कहर सुरु असताना ही मार्गदर्शक तत्त्वे लिहिली गेली होती. ती त्यावेळी उपलब्ध असलेल्या माहिती आणि निष्कर्षांच्या आधारे तयार केली होती. त्यातली काही तत्त्वे आता बदलली आहेत. वाचकांनी ताजी माहिती अधिकृत संकेत स्थळावरून पहावी. publichttps://www.who.int/emergencies/diseases/novel-coronavirus-2019/advice-for-public


| | |
|---|---|
| अध्यक्ष २०२३ | : डॉ. रमाकांत पाटील |
| सचिव २०२२-२३ | : डॉ. अमोल पवार |
| अध्यक्ष २०२२ | : डॉ. हेमंत गन्गोलीया |
| मार्गदर्शक | : डॉ. जयंत उपाध्ये |
| समन्वयक | : डॉ. नरेंद्र नानिवडेकर |
| अनुवादक | : डॉ. रेणु बोराळकर |
| पुनरावलोकन | : डॉ. सुचित तांबोळी, श्री धनंजय कुरणे |

*Writing Group:* **Mahesh A Mohite**
**Bakul Parekh**
**Deepak Ugra**




### खालील माहिती आजपर्यंत (एप्रिल२०२१) उपलब्ध असलेल्या संशोधन आणि पुराव्यावर आधारित आहे::

१ गेल्या वर्षी २०१९च्या पहिल्या कोरोना लाटेपेक्षा दुसरी लाट अधिक गंभीर आहे का?
२ मी माझ्या मुलांमध्ये कोरोना व्हायरस संसर्ग कसा रोखू शकतो?
३ मुलांमध्ये ताप कोवीडचा आहे की नाही हे कसे कळू शकते?
४ कोरोना संसर्गाची कोणती सामान्य लक्षणे मुलांमध्ये दिसतात?
६ आपण कोणती कोरोनाची चाचणी मुलांच्यामध्ये करावी?
७ कुटुंबातील वेगवेगळ्या परिस्थिती कशा असू शकतात? त्यांचे व्यवस्थापन कसे करावे?
८ मुलांसाठी मास्क घालणे आवश्यक आहे का?
९ कोव्हीड संसर्गाने मुलांची प्रकृती गंभीर होऊ शकते का?
१० कोणत्या मुलांना गंभीर कोव्हीड रोग होऊ शकतो?
११ माझ्या कोव्हीड पॉझिटिव मुलाच्या काळजीबद्दल काय आणि कशी काळजी घ्यावी?
१२ मी माझ्या मुलांसाठी काही घरगुती उपाय वापरु शकते काय? zithromycin, ivermectin, doxy, hydroxychloroQuine (HCQ) सारख्या औषधांचे काय? काही आयुर्वेदिक किंवा होमिओपॅथी औषधे वापरता येतील का?
१३ माझ्या मुलाला गंभीर कोव्हीड झालेला मला कसा समजेल?
१४ माझ्या मुलाला जुने आजार आहे, मी त्याचे उपचार / इतर उपचार सुरू ठेवू शकतो का?
१५ डॉक्टर आम्ही स्टिरॉइड्स, favipiravir, remdesivir, tociluzimab इ. बद्दल ऐकले आहे ते कधी वापरायचे?
१६ माझ्या मुलाची कोव्हीड चाचणी १ आठवड्यापूर्वी पॉझिटिव्ह आली. त्याला दोन आठवड्यानंतर एक लस due आहे. मी त्याला ती लस देऊ की नको?
१७ मुलाला स्तनपान करणारी माता कोव्हीड-ची लस घेऊ शकते का?
१८ बाळाला स्तनपान करणारी आई कोव्हीडची लस घेऊ शकते का?

**Under the Auspices of the IAP Action Plan 2020–2021**


**Piyush Gupta** IAP President 2021

**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021

**Bakul Parekh** IAP President 2020

**GV Basavaraja** IAP HSG 2020–2021

**Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

**Core Group**

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

# लहान मुलांमधील करोना व्हायरस आजार २०१९ (२५/४/२०२१ तारखेस उपलब्ध माहितीनुसार)

**खालील माहिती आजपर्यंत (एप्रिल २०२१) उपलब्ध असलेल्या संशोधन आणि पुराव्यावर आधारित आहे**

प्रश्न (१)

## गेल्या वर्षीच्या कोवीडच्या पहिल्या लाटेपेक्षा, दुसरी लाट अधिक गंभीर आहे का?

होय संक्रमित लोकांची संख्या खूप जास्त प्रमाणात आहे एकूण संक्रमित बालकांच्या संख्येतही वाढ झालेली आहे. हे बहुधा अशा जनुकांमध्ये बदललेल्या विषाणूमुळे असावे. जेथे लोकांनी घ्यावयाची खबरदारी (सामाजिक अंतर, मास्क घालणे आणि हाताची स्वच्छता) बद्दल पाळली गेली नाही, त्यामुळे कोव्हीड संसर्ग खूप झपाट्याने पसरत आहे असे दिसते. आम्ही पहातो की संपूर्ण कुटुंबच्या कुटुंब, कमी वेळात संक्रमित होतायेत.

प्रश्न (२)

## मी माझ्या मुलांमध्ये कोरोना व्हायरसचा संसर्ग कसा रोखू शकतो?

कोणत्याही व्यक्तीमध्ये कोरोना व्हायरसचा संसर्ग रोखण्यासाठी कोणतीही औषधे किंवा गोळ्या सध्या उपलब्ध नाहीत, ज्या प्रामुख्याने रोगापासून संरक्षण करतात. सध्या फक्त प्रौढांसाठी वापरण्याची मुभा सरकारने दिलेली आहे. १ मे २०२१, पासून १८ वर्षापेक्षा जास्त वयाच्या प्रौढांसाठी लागू केली जाईल

- हात धुणे, योग्य मास्कचा वापर आणि सामाजिक अंतर याची काटेकोर खबरदारीच ह्याला प्रतिबंध करु शकते.
- सार्वजनिक कार्यक्रमांना उपस्थित राहणे टाळा, सामाजिक मेळावे, लग्न टाळा, गर्दीची ठिकाणे, सामूहिक खेळ टाळावे, हेच उपाय आहे ज्याद्वारे आपण मुलांमध्ये आणि घरातील लोकांना कोरोना व्हायरसची लागण होण्यापासून संरक्षण करु शकतो.

प्रश्न (३)

## मुलांमध्ये ताप कोव्हीडचा आहे की नाही हे कसे कळू शकते?

सध्या सामान्य माणसासाठी आणि डॉक्टरांसाठी हा फरक जाणून घेणे कठीण आहे. म्हणून प्रत्येक ताप / खोकल्यात कोरोना व्हायरस या रोगाची शक्यता मानली पाहिजे. विशेषतः कुटुंबातील एखाद्या सदस्याला त्रास होत असेल किंवा अलीकडे कोव्हीड झाला असेल

प्रश्न (४)

## मुलांमध्ये कोरोना संसर्गाच विशिष्ट लक्षणे काय आहे?

सर्दी, सौम्य खोकला, ताप आणि अंगदुखी ही कोरोना संसर्गाची सामान्य लक्षणे मुलांमध्ये दिसतात दुसऱ्या लाटेमध्ये असे आढळून आले आहे की इतर लक्षणे उदा: पोटदुखी, पातळ शी, गळून जाणे, उलटी होणे देखील मुलांमध्ये दिसून येतात.

प्रश्न (५)

## आम्ही मुलांची कोरोना विषाणू चाचणी कधी करू शकतो?

- कुटुंबातील सदस्य पॉझिटिव्ह असल्यास चाचणी करा
- मुलाची लक्षणे कोव्हीडसारखी असल्यास चाचणी करा (वर लक्षणे सांगितल्याप्रमाणे)
- तीन दिवसापेक्षा अधिक ताप येत असल्यास चाचणी करा.

प्रश्न (६)

## आम्ही कोणती कोव्हीडची चाचणी करावी?

- कोरोना वायरस रोग २०१९ साठी RT-PCR आणि PCR आधारित न्यूक्लिकसिड अम्प्लिफिकेशन टेस्ट (NAAT)च्या चाचण्याना प्राधान्याने करतात. द्रुढ. जलद प्रतिजन चाचणी हा दुसरा पर्याय आहे.
- एक सकारात्मक चाचणी निदानाची खात्री दर्शवते, तथापि नकारात्मक चाचण्यांच्या निकालाची पीसीआरद्वारे पुष्टी करणे आवश्यक आहे.
- छातीचा सिटीस्कॅन ही कोव्हीडसाठी चाचणी नाही आणि तुमच्या डॉक्टरांची शिफारस असल्यावरच केली पाहिजे.

## प्रश्न (७)

### कुटुंबांमध्ये वेगवेगळी परिस्थिती काय असू शकते त्याचे व्यवस्थापन कसे करावे ?

- आई आणि मुले दोघे पॉझिटिव्ह असल्यास: आई जर खूप आजारी नसेल आणि रुग्णालयात दाखल नसेल तर मुलाला आईसोबत राहू द्यावे लहान मुलांमध्ये शक्य तितके स्तनपान चालू ठेवावे
- आई पॉझिटिव आणि मुलगा नकारात्मक: जर मूल आणि आई खूप आजारी किंवा रुग्णालयात दाखल नसेल, तर आई मुलाची काळजी घेऊ शकते. आईने शक्य असलेले निर्जंतुकीकरण, योग्य मास्क आणि सामाजिक विलगीकरण पद्धतीचे पालन (SMS) केले पाहिजे.
- मूल पॉझिटिव्ह आणि पालक negative तरीही पालक रुग्णालयात किंवा बाहेर मुलाची काळजी घेऊ शकतात अशा परिस्थितीत पालकांनी त्यांच्या स्वतःच्या रक्षणासाठी योग्य मास्क/वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे (PPE kit) वापरावीत.

कोव्हीड संशयित (suspected) मुलांना कृपा करून त्यांच्या आजी-आजोबांना बरोबर रहाणे टाळावे. वृद्ध लोकांना कोव्हीडचा गंभीर आजार होण्याचा धोका जास्त असतो आणि जोपर्यंत मुलाची स्थिती निश्चितपणे negative होत नाही तोपर्यंत मुलांना आजी-आजोबांकडे जाऊ देऊ नका. त्यांच्याकडे सोडू नका.

## प्रश्न (८)

### मुलांना मास्क घालणे आवश्यक/गरजेचे आहे का ?

होय दोन वर्षापेक्षा जास्त वयाच्या सर्व मुलांनी मास्क घालणे आवश्यक आहे (इंडियन अकॅडमी ऑफ pediatrics शिफारस). दोन वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांना मास्क वापरण्याची गरज नाही कारण ते त्यांच्यासाठी असुरक्षित होऊ शकते.

## प्रश्न (९)

### कोरोना आजारामुळे मुले गंभीर/सिरीयस होऊ शकतात का ?

- लहान मुलामध्ये गंभीर आजार फार कमी प्रमाणात दिसून येतो
- जरी प्रौढ आणि वृद्धांनामध्ये जास्त प्रमाणात असला तरीही ६०%-७०% पेक्षा जास्त संक्रमीत मुले लक्षणं नसलेली असतात.
- ज्या मुलांमध्ये लक्षणे दिसतात यांच्यापैकी फक्त १-२% यांना आयसीयूमध्ये भरती करावे लागते हे प्रमाण प्रौढांच्यापेक्षा खूप खूप कमी आहे.

प्रश्न (१०)

### कोणत्या प्रकारच्या मुलांना गंभीर आजार होण्याचा धोका आहे?

ज्या मुलांना दीर्घकालीन अस्तित्वात असलेले मोठे आजार उदा: हृदय, किडनी, यकृताचे आजार इत्यादी; कमी प्रतिकारशक्ती असलेल्या मुलांना, कर्करोग, जन्मापासूनच कमी प्रतिकारशक्तीचे आजार इ. मुलांना गंभीर आजार होण्याचा धोका जास्त असतो.

प्रश्न (११)

### माझ्या कोव्हीड पॉझिटिव मुलाच्या काळजीबद्दल मला सल्ला द्यावा?

- तुमच्या मुलाला दवाखान्यात नेण्यापेक्षा तुमच्या डॉक्टरांकडून टेलिफोनवर सल्ला घेणे उत्तम आहे.
- हे इतरांमध्ये पसरण्यास प्रतिबंध करेल आणि प्रवास करतानाचा त्रास आणि तुमच्या मुलाची प्रतीक्षा कक्षात वाट पाहण्याचा क्लेश कमी करेल.
- तुम्ही आईएपी (IAP वेबसाईट) iapindia.org., WHO, AIIMS, PGI etcसारख्या प्रामाणिक संस्थात्मक वेबसाईटवरून व्यवस्थित माहिती मिळवू शकता. जर काही, मुलामध्ये गांभीर्य/धोक्याच्या सुचना जाणवल्या तर मुलाला त्वरित डॉक्टरकडे नेले पाहिजे

प्रश्न (१२)

### मी माझ्या मुलालासाठी कोणता घरगुती उपाय करू शकतो?

- घरी उपलब्ध असल्यास दर सहा तासांनी पल्स ऑक्सीमीटर्स व तापमापीने तापमान आणि ऑक्सिजन मापन रेकॉर्ड करा.
- १००°F पेक्षा जास्त ताप असल्यास पारासेटामाल १० – १५ mg/kg डोस द्या.
- भरपूर पाणी/द्रव पदार्थ द्या आणि हलका आहार द्या. स्वच्छता राखा.
- एकंदर आरोग्य आणि प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी व्हिटॅमिन C, झिंक देऊ शकतो.

प्रश्न (१३)

### अझीथ्रोमायसीन, इव्हरमेकटीन, hydroxychloroquine HCqS, / आयुर्वेदिक/होमिओपॅथी औषधे उपयोगी आहे का?

मुलांमध्ये कॉविडच्या उपचारांसाठी वरील औषधे वापरण्याचा कोणताही वैज्ञानिक पुरावा नाही. जेव्हा प्रौढांना गंभीर आजाराने रुग्णालयात दाखल केले जाते तेव्हा यापैकी काही औषधे वापरली जातात. घरगुती उपचारांमध्ये/आयुर्वेद/होमिओपॅथी औषधांची भूमिका नाही.

प्रश्न (१४)

## मी माझ्या मुलाला कोव्हीड संसर्ग कधी गंभीर झाला आहे असे मानू?

हे जाणून घेणे खूप महत्वाचे आहे आणि पाच लक्षणे किंवा चिन्हे खालीलप्रमाणे घरी निरीक्षण करणे आवश्यक आहे

१ खूप जास्त ताप चार किंवा पाच दिवसांपेक्षा जास्त काळ टिकणे

२ मुलाचे खाणे पिणे कमी होणे/लघवी खूप कमी येणे

३ मुल सुस्त/झोपलेले असणे

४ श्वसन दर वाढणे

५ घरी पल्स ऑक्सीमीटरवर ९५% पेक्षा कमी निष्कर्ष येणे (चांगल्या प्रदर्शित लहरींचे योग्य रेकॉर्डिंग सुनिश्चित करावे. pulse oximeter)

अशा परिस्थितीत तुम्ही तुमच्या मुलाला त्वरित कोव्हीड careच्या रुग्णालयात नेले पाहिजे.

प्रश्न (१५)

## माझ्या मुलाला दीर्घकालीन आजार आहे. मी त्याचे स्टिरॉइड सुरू ठेवू का/ इतर उपचार सुरू ठेवू का?

जो पर्यंत तुमच्या मुलाला गंभीर कोव्हीड आजार होत नाही, तोपर्यंत आधीच अस्तित्वात असलेल्या आजारांच्या उपचारांमध्ये बदल करण्याची गरज नाही. अशा मुलांमध्येवर नमूद केल्याप्रमाणे एसएमएस (SMS) द्वारे प्रतिबंधात्मक काळजी घेणे आणि संसर्ग टाळण्यासाठी काही विशिष्ट खबरदारी घरी घेणे महत्त्वाचे आहे

अशा मुलामध्ये संसर्ग झाल्यास चालू असलेल्या औषधांबद्दल विशिष्ट सल्लयासाठी आपल्या डॉक्टरांना विचारणे गरजेचे आहे

प्रश्न (१६)

## डॉक्टर आम्ही स्टिरॉइड्स, फेविपीरावीर, रेमडेसविर, Tociluzimab इ. औषधांबद्दल ऐकले आहे, ते मुलांमध्ये कधी वापरले जातात?

बालपणीच्या कोविड रुग्णांमध्ये या औषधांची मर्यादित उपयोगिता आहे. काहींचा वापर फक्त गंभीर कोव्हीड असलेल्या बालकांमध्ये केला जातो. सामान्यतः आयसीयूमध्ये (ICU) आतापर्यंत कोव्हीडग्रस्त मुलांमध्ये, त्यांची (वरील औषध) जवळ जवळ कधीही गरज पडली नाही.

प्रश्न (१७)

## माझ्या मुलाची कोव्हीड चाचणी, १ आठवड्यापूर्वी पॉझिटिव्ह आली आहे. त्याचे आता दोन आठवड्यानंतर नेहमीचे लसीकरण आहे. मी त्याला ते देऊ शकतो का?

- नियमित लसीकरण होऊ शकते, कोव्हीड लक्षणें असल्याच्या दोन आठवड्यांनी लस घेऊ शकतात.
- जर बाळाला काही ज्यादा डोस स्टिरॉइड्स/ tocilizumab औषध दिले गेले असतील तर, ह्या मुलांमध्ये प्रतिकारशक्ती कमी होते म्हणून ही औषधे मिळाल्यास, यांना तीन महिन्यानंतर नेहमीचे लसीकरण पुढे ढकलून, आवश्यक त्या लसी दिल्या जाऊ शकतात.

प्रश्न (१८)

## बाळाला स्तनपान करणारी आई कोव्हीडची लस घेऊ शकते का?

सध्याच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार गर्भवती महिला आणि स्तनपान करणाऱ्या महिलांना ही कोव्हीड लस दिली जात नाही (April २०२१).